## मुंबई शहर जिल्हास्तरीय क्रीडा प्रतिभा विकास केंद्रासाठी निवड प्रक्रिया जाहीर

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत 'मिशन लक्ष्यवेध' अंतर्गत मुंबई शहर जिल्हास्तरीय क्रीडा प्रतिभा विकास केंद्रासाठी निवड प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. जिल्ह्यातील गुणवंत खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण, आवश्यक सुविधा व तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देऊन राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या उपक्रमांतर्गत मुंबई शहरासाठी शूटींग, टेबल टेनिस आणि वेटलिफ्टिंग या तीन क्रीडा प्रकारांच्या प्रतिभा विकास केंद्रांना मंजुरी देण्यात आली असून संबंधित खेळांसाठी निवड चाचण्या आयोजित करण्यात आल्या आहेत. निवड प्रक्रियेदरम्यान तज्ज्ञ प्रशिक्षकांमार्फत खेळाडूंच्या कौशल्याचे परीक्षण करण्यात येणार असून निवड झालेल्या खेळाडूंना प्रगत प्रशिक्षणासह करिअर मार्गदर्शन दिले जाणार आहे.

**निवड चाचण्यांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे-**

शुटींग व टेबल टेनिस - कामगार कल्याण मंडळ, दादर – २६ मे २०२६

वेटलिफ्टिंग – नॅशनल हेल्थ लीग, आझाद मैदान – २ जून २०२६

या निवड चाचण्यांसाठी २१ वर्षांखालील खेळाडू पात्र असून जिल्हास्तरीय पदकप्राप्त तसेच विभागीय, राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावर सहभाग घेतलेला असणे आवश्यक आहे.

इच्छुक खेळाडूंनी अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २४ मे २०२६ असून अर्जासोबत जन्मदाखला, पासपोर्ट साईज फोटो, शाळा सोडल्याचा दाखला किंवा स्थलांतर प्रमाणपत्र, आधार कार्ड, मेडिकल सर्टिफिकेट, क्रीडा कामगिरीची प्रमाणपत्रे, रहिवासी दाखला, बोनाफाईड सर्टिफिकेट आणि पालक संमतीपत्र जोडणे आवश्यक आहे. निवड चाचणीच्या दिवशी सर्व मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नीलिमा अडसूळ यांनी केले आहे.

निवड चाचणीसंदर्भात अधिक माहितीसाठी श्री.गराटे ९७०२२१२९२५ साहिल उतेकर ९७०२१७१००४ आणि समृद्धी देवळेकर ८७७९७२७५७१ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पावसाळापूर्व तयारीचा आढावा म्हणून लोकप्रतिनिधींनी केली पर्जन्य जल उदंचन केंद्रांची पाहणी

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

पावसाळापूर्व तयारीचा एक भाग म्हणून मुंबईतील लोकप्रतिनिधींनी रे रोडस्थित ब्रिटानिया पर्जन्य जल उदंचन केंद्र, वरळी येथील लव्हग्रोव्ह पर्जन्य जल उदंचन केंद्र आणि क्लिव्हलँड पर्जन्य जल उदंचन केंद्रांची आज (दिनांक१९ मे २०२६) प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्हयाचे सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, आमदार अमीत साटम यांच्यासह महानगरपालिकेचे विविध पदाधिकारी या दौ-यात सहभागी झाले होते. मुंबई महानगराची भौगोलिक रचना लक्षात घेता सखल भागांमध्ये साचणाऱया पावसाच्या पाण्याचा जलद आणि परिणामकारक निचरा व्हावा, यासाठी महानगरपालिकेने सर्वंकष कृती आराखडा तयार केला आहे. हा आराखडा केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे, अशी माहिती आमदार अमीत साटम यांनी यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना दिली.

मुंबईच्या महापौर रितू तावडे या मागील पंधरवड्यापासून पावसाळापूर्व कामांचा प्रत्यक्ष कार्यस्थळी जाऊन सातत्याने आढावा घेत आहेत. पूर्व व पश्चिम उपनगरे तसेच शहर विभागातील नालेसफाई आणि रस्ते विकास कामांची पाहणी केल्यानंतर, त्यांच्या नेतृत्वाखाली विविध पदाधिकाऱयांनी आज (दि. १९ मे २०२६) विविध पर्जन्यजल उदंचन केंद्रांची पाहणी करून तेथील यंत्रणा व पावसाळापूर्व तयारीची सविस्तर माहिती घेतली.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्ह्याचे सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, महापौर रितू तावडे, आमदार अमीत साटम, महानगरपालिकेचे सभागृह नेते गणेश खणकर, स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे, शिवसेना गटनेते अमेय घोले, सुधार समिती अध्यक्ष संध्या दोशी (सक्रे), शिक्षण समिती अध्यक्ष राजेश्री शिरवडकर, 'बेस्ट' समिती अध्यक्ष तृष्णा विश्वासराव, स्थापत्य समिती (शहर) अध्यक्ष यामिती जाधव, स्थापत्य समिती (उपनगरे) अध्यक्ष संगीता शर्मा, सार्वजनिक आरोग्य समिती अध्यक्ष हरिष भांदिर्गे, महिला व बाल विकास समितीच्या उपाध्यक्ष रिटा मकवाना, नगरसेवक रोहिदास लोखंडे, नगरसेवक अजय पाटील, नगरसेवक भास्कर शेट्टी आदी लोकप्रतिनिधी या दौ-यात सहभागी झाले होते. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांच्यासह पर्जन्य जल वाहिन्या विभागाचे संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

महापौर रितू तावडे म्हणाल्या की, मुसळधार पावसाच्या वेळी आणि भरतीच्या (High Tide) काळात साचलेले पावसाचे पाणी उदंचन संचांच्या साहाय्याने समुद्रात सोडण्याचे महत्वपूर्ण कार्य पर्जन्य जल उदंचन केंद्रांमार्फत केले जाते. ओहोटीच्या (Low Tide) काळात पूर नियंत्रक दरवाजे (Flood control Gates) खुले असतात, त्यावेळी नाल्यातील पाणी नैसर्गिकरित्या गुरुत्वाकर्षणाने थेट समुद्रात वाहून जाते. भरतीच्या काळात साचलेले पावसाचे पाणी उदंचन संचांच्या साहाय्याने समुद्रात सोडले जाते. पूर नियंत्रक दरवाजांचा उपयोग भरतीच्या काळात समुद्राचे पाणी नाल्यामध्ये प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्याकरिता केला जातो. तसेच, नाल्यातील कचरा अडवून काढण्यासाठी या यांत्रिक जाळी प्रणालीचा वापर केला जातो. सध्या हाजी अली (महालक्ष्मी), इर्ला (जुहू), लव्हग्रोव्ह (वरळी), क्लिव्हलँड (वरळी गाव), ब्रिटानिया (रे रोड), गझदरबंध (सांताक्रूझ) अशी ६ उदंचन केंद्रे कार्यरत आहेत. उर्वरित २ उदंचन केंद्रे म्हणजे माहुल (चेंबूर) आणि मोगरा (वेसावे) यांची कार्यवाही प्रगतिपथावर आहे, असेदेखील महापौर तावडे यांनी नमूद केले.

प्रसारमाध्यम प्रतिनिधींसमवेत संवाद साधताना आमदार अमीत साटम म्हणाले की, महानगरपालिकेचे पदाधिकारी स्वतंत्रपणे आणि एकत्रितपणे पावसाळापूर्व कामांची पाहणी, निरीक्षण करत आहेत. प्रशासनाने केलेल्या विविध उपाययोजनांची माहिती घेत आहेत. तसेच, आवश्यक ते निर्देश देत आहेत. पावसाळ्याच्या कालावधीत मुंबईकरांची गैरसोय होवू नये, सखल भागात साचलेल्या पाण्याचा जलद गतीने निचरा व्हावा याद्दष्टीने प्रयत्न केले जात आहेत. उदंचन केंद्रांमुळे मुंबईकरांना मोठा दिलासा मिळतो. त्यामुळे ही उदंचन केंद्रे योग्य पद्धतीने कार्यान्वित आहेत का, याची पाहणी आज करण्यात आली. याखेरिज, पाणी उपसा करण्यासाठी मुंबई महानगरात विविध ठिकाणी ५५० हून अधिक उदंचन संच तैनात करण्यात आले आहेत. नाले / नदीस्वच्छतेची कामे प्रगतिपथावर आहेत. निर्धारित कालावधीत नालेस्वच्छतेची कामे पूर्ण होतील, असा विश्वास आहे. समुद्रात जाणारा घनकचरा / तरंगता कचरा रोखला पाहिजे, असे निर्देश प्रशासनाला दिले आहेत, असे त्यांनी नमूद केले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने भारतीय औद्योगिक संस्थेच्या (आयआयटी, मुंबई) माध्यमातून मुंबई महानगराची भौगोलिक रचना लक्षात घेता सखल भागांमध्ये साचणाऱया पावसाच्या पाण्याचा जलद आणि परिणामकारक निचरा व्हावा, यासाठी महानगरपालिकेने सर्वंकष कृती आराखडा तयार केला आहे. हा आराखडा केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. केंद्रीय निधीतून आराखड्याची अंमलबजावणी केली जाईल, अशी माहिती आमदार अमीत साटम यांनी यावेळी दिली.

## ई-चलन संदर्भातील मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेऊ - परिवहन मंत्री

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीच्या शिष्टमंडळाने मंत्रालयात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत भेट घेऊन ई-चलन प्रणाली, वेगमर्यादा नियम, एएनपीआर कॅमेरे तसेच दंड आकारणी संदर्भातील विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी वाहतूकदारांच्या मागण्यांबाबत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, माजी आमदार सुजित मिणचेकर यांच्यासह कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीचे अध्यक्ष प्रदीप राठोड, सदस्य मनोज चौगुले, महेंद्र काळभोर, पंकज त्रिपाठी, अशोक शिंदे, गौरव कुसाळे, रफिक रावथर, अशोक कुचकोरवी, राजु ढाले, सुनील मगदुम आदी उपस्थित होते.

शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात जुन्या ई-चलनांची



सरसकट रद्दबातल, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वेगमर्यादेचा पुनर्विचार, एएनपीआर कॅमेऱ्यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा, वाहनांमधील अंतराच्या नियमांमध्ये व्यवहार्य बदल तसेच दंडावरील चक्रवाढ पद्धत रद्द करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, वाहतूक व्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे वाहतूकदारांच्या अडचणी शासन गंभीरपणे ऐकत असून, नियमांची अंमलबजावणी करताना अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाईल. ई-चलन आणि वेगमर्यादा संदर्भातील तक्रारींबाबत संबंधित विभागांकडून सविस्तर अहवाल मागवून आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल. तसेच, रस्ते सुरक्षा अबाधित ठेवत वाहतूकदारांना दिलासा मिळेल, अशा पद्धतीने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## बोरीवली (पश्चिम) येथे 22 मे रोजी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगर आणि सायली कॉलेज, बोरीवली (पश्चिम) यांच्या संयुक्त विद्यमाने २२ मे २०२६ रोजी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. हा रोजगार मेळावा सायली कॉलेज, गोराई रोड, एम.एच.बी. कॉलनी, गोराई नगर, बोरीवली (पश्चिम), मुंबई येथे सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत होणार आहे.

या रोजगार मेळाव्यात मुंबईतील नामांकित कंपन्या सहभागी होणार असून विविध रिक्त पदांसाठी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येणार आहेत. तसेच प्राथमिक निवड प्रक्रियाही याच ठिकाणी पार पडणार आहे. याशिवाय शासनाच्या विविध महामंडळांच्या योजनांची माहिती देण्यात येणार असून उमेदवारांना मोफत प्रशिक्षणाच्या संधीही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना तसेच प्रधानमंत्री इंटर्न योजना अंतर्गत प्रशिक्षणाचा लाभ उमेदवारांना मिळणार आहे. दहावी, बारावी उत्तीर्ण तसेच आयटीआय व विविध शाखांतील पदवीधर उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगरचे सहाय्यक आयुक्त रोलेक्स अर्जुनराव भगत यांनी केले आहे.

## ओबीसी समाजाच्या विकासासाठी केंद्र-राज्य समन्वयातून योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी- मुख्यमंत्री

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयातून विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. ओबीसींसाठी विविध योजनांची अंमलबजावणी गुणवत्तापूर्ण आणि परिणामकारक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.ओबीसी समाजाचा विकास हा राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

इतर मागासवर्ग कल्याण संसदीय समितीने हॉटेल ट्रायडेंट येथे भेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतली. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, इतर मागासवर्ग कल्याण संसदीय समितीचे अध्यक्ष गणेश सिंह यांच्यासह समितीतील अन्य सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ओबीसी समाजाच्या उन्नतीसाठी शैक्षणिक सक्षमीकरण आणि आर्थिक उन्नतीच्या विविध योजना राज्य शासन प्रभावीपणे राबवत आहे. राज्य शासनाने स्वतंत्र इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्थापना करून ओबीसी, विजाभज, एसबीसी आणि इतर मागास घटकांसाठी विविध कल्याणकारी योजनांना गती दिली आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, परदेशी शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना १०० टक्के फी सवलत देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

ओबीसी विभागामार्फत आश्रमशाळा चालविण्यात येत असून ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जात आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये मुला-मुलींसाठी एकूण ७२ वसतिगृहे सुरू करण्यात आली असून यासाठी इतर मागासा बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'स्वयंम' योजना सुरू करण्यात आली असून या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना राहणीमान आणि शिक्षणासाठी ६० हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते. महाज्योती संस्थेमार्फत यूपीएससी आणि एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून यूपीएससीमध्ये २९ तर एमपीएससीमध्ये ११८ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असल्याची माहिती त्यांनी दिली.

स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी ओबीसी महामंडळामार्फत युवकांना १५ लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जात असून या कर्जाला शासन हमी देते. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ न मिळालेल्या घटकांसाठी 'मोदी आवास योजना' सुरू करण्यात आली असून घरकुलासाठी आर्थिक सहाय्य दिले जात आहे. याशिवाय सौरऊर्जेसाठी स्वतंत्र अनुदान दिले जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ओबीसी कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता अधिक वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असून समितीकडून प्राप्त होणाऱ्या सूचनांचा विचार करून आवश्यक सुधारणा करण्यात येतील असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

## समुद्रातील तरंगता कचरा काढण्यासाठी भारताचे प्रवेशद्वार आणि बधवार पार्क येथे मानवरहित विद्युत नाव कार्यरत

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

समुद्र किनारा आणि लगतचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. याच अनुषंगाने, समुद्रातील तरंगता कचरा संकलित करण्यासाठी भारताचे प्रवेशद्वार (गेटवे ऑफ इंडिया) आणि बधवार पार्क परिसरात मानवरहित विद्युत नाव (इलेक्ट्रिक बोट) कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या नावेच्या माध्यमातून या परिसरातून रोज सुमारे ८० ते ९० किलो तरंगता कचऱयाचे संकलन केले जाते.

बृहन्मुंबई क्षेत्रातील (मुंबई शहर आणि उपनगरे) स्वच्छता राखण्यासाठी तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) श्री. किरण दिघावकर यांच्या देखरेखीत विविध उपाययोजना केल्या जात आहेत.

याच पार्श्वभूमीवर, उपायुक्त (परिमंडळ-१) श्रीमती चंदा जाधव यांच्या मार्गदर्शनात आणि सहायक आयुक्त (ए विभाग) श्री. गजानन बेल्लाळे यांच्या नेतृत्वात महानगरपालिकेच्या 'ए' विभागातील भारताचे प्रवेशद्वार आणि बधवार पार्क परिसरात दोन मानवरहित विद्युत




नाव (इलेक्ट्रिक बोट) कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. ही नाव पूर्णपणे विद्युत ऊर्जेवर चालणारी असून पर्यावरणपूरक आहे. यामध्ये वाहन वाहतूक व्यवस्थापन प्रणाली (व्हिटीएमस) आणि जागतिक स्थाननिर्धारण प्रणाली (जीपीएस) असून याद्वारे नावेचे मार्गक्रमण, कार्यक्षेत्र आणि सुरक्षिततेबाबत नियंत्रण करता येते. समुद्रातील विविध प्रकारचा तरंगता कचरा संकलनाचे कार्य ही नाव अधिक प्रभावी आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यास सक्षम आहे.

## कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचा कायापालट होणार

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

कोल्हापूरच्या ऐतिहासिक आणि शैक्षणिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या शिवाजी विद्यापीठ परिसरातील रखडलेल्या समस्या आता कायमच्या मिटणार आहेत. विद्यापीठ प्रशासनाचा आणि कोल्हापूर महानगरपालिकेचा बऱ्याच दिवसांपासूनचा प्रलंबित वाद संपवून येथील पायाभूत सुविधांचे प्रश्न तातडीने मार्गी लावा, असे थेट आणि कडक निर्देश राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले आहेत. मंत्रालयातून आयोजित करण्यात आलेल्या एका अत्यंत महत्त्वाच्या दूरदृश्य (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग) संयुक्त बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीत आमदार अमल महाडीक यांच्यासह उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि कोल्हापूर मनपाचे आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड प्रामुख्याने उपस्थित होते. विद्यापीठ परिसरात शिक्षण घेणारे हजारो विद्यार्थी, तेथे कार्यरत असलेले प्राध्यापक आणि स्थानिक नागरिकांना दैनंदिन नागरी सुविधा मिळण्यात अनेक अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर मंत्र्यांनी दोन्ही संस्थांमधील समन्वय सुस्ती झटकून कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत.


## जाहिर नोटीस

प्रतिष्ठित व अनुभवी विक्रेते / संस्था यांच्याकडून अवंत हेरिटेज टॉवर २ सीएचएस (९८ निवासी फ्लॅट्स व ३ कार्यालये), माजासवाडी, दिगंबर म्हसकर रोड, जोगेश्वरी पूर्व, मुंबई – ६० येथे खालील देखभाल व सेवा कामांसाठी दरपत्रके (Quotations) मागविण्यात येत आहेत :

जिम देखभाल, स्विमिंग पूल देखभाल, प्लंबिंग कॉन्ट्रॅक्ट, सुरक्षा सेवा, हाऊसकीपिंग सेवा, स्ट्रक्चरल रिपेअर कामे, एसी सर्व्हिसिंग, अकाउंटिंग व टॅक्स कन्सल्टंट, कचरा संकलन सेवा, एसटीपी देखभाल, लिफ्ट व स्टॅक मेंटेनन्स, अग्निसुरक्षा सेवा, सीसीटीव्ही व इंटरकॉम देखभाल

इच्छुक विक्रेते/संस्था यांनी वैध GSTIN क्रमांक व संबंधित अनुभवासह तांत्रिक व आर्थिक तपशील जोडून आपली दरपत्रके सादर करावीत.

प्रोफाइल व कोटेशन ७ दिवसांच्या आत सचिवांकडे पाठवावेत.

**ई-मेल : avant2members@gmail.com**
**संपर्क : श्री. प्रकाश बिडये**

ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
**Phone:** +91 8451942710| **Website:** www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **APPL00003817** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger.net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

कर्जदाराचे नाव: (१) मे. वैशाली ट्रान्सकॅरियर्स प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार), ऑफिस नं. ११०७, ११वा मजला, लोढा सुप्रीमस, आय थिंक टेक्नो कॅम्पस, कांजूरमार्ग स्टेशन समोर, कांजूरमार्ग पूर्व, मुंबई–४०००४२.

सह–कर्जदाराचे/कर्जदारांची नावे: (२) श्री. शशांक वामन पवार (सह–कर्जदार), फ्लॅट नं. १५०१, गुरनानी पाम्स, बी–विंग, अंबाली, अंधेरी पश्चिम, मुंबई–४०००५८. (३) श्रीमती वैशाली वामन पवार (सह–कर्जदार), फ्लॅट नं. १५०१, गुरनानी पाम्स, बी–विंग, अंबाली, अंधेरी पश्चिम, मुंबई–४०००५८.

मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट नं. ११०२, ११वा मजला, एसबीआय स्टाफ पल्लवी सीएचएसएल, प्लॉट नं. ०१, आझाद नगर, वीरा देसाई रोड, सीटीएस नं. १५०–ए (भाग), गाव आंबिवली, अंधेरी (प), मुंबई–४०००५८.

| | |
|---|---|
| थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | रु. १,८३,०३,४०४/– (फक्त एक कोटी त्र्याऐंशी लाख तीन हजार चारशे चार रुपये) |
| लिलावाची तारीख | २९ जून २०२६ |
| राखीव किंमत | रु. २,४४,००,०००/– (फक्त दोन कोटी चव्वेचाळीस लाख रुपये) |
| कमाईची रक्कम ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. २५,०००/– (फक्त पंचवीस हजार रुपये) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | २२ जून २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी. | २५ जून २०२६ केवायसी कागदपत्रांसह दुपारी ४ वाजेपर्यंत |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | २९ जून २०२६ सकाळी १0:00 ते दुपारी १:00 च्या दरम्यान |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी.

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) कीवा सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना १५ दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: १९ मे २०२६ — आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण: मुंबई — अधिकृत स्वाक्षरीकर्ता

ANAND RATHI — आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड: एक्सप्रेस झोन, ए विंग, १०वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, तिरपे ओबेरॉय मॉल समोर, गोरेगाव (ई), मुंबई – ४०० ०६३ भारत — **मागणी सूचना**

तर कर्जदार/सह–कर्जदारांनी आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडकडून आर्थिक सहाय्य घेतले आहे. आम्ही सांगतो की आर्थिक सहाय्याचा लाभ घेतल्यानंतरही, कर्जदार/सहकर्जदारांनी देय तारखेनुसार व्याज आणि मुद्दल रकमेची परतफेड करण्यात विविध चुका केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी केलेल्या निर्देशांनुसार/मार्गदर्शक तत्त्वांनुसार येथे नमूद केलेल्या संबंधित तारखांना खाते नॉन–परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकृत केले आहे. आनंद राठी ग्लोबल फायनान्स लि.चे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराच्या वापरात कायदा, **SARFAESI 2002** च्या कलम १३(२) अन्वये खाली नमूद केलेल्या संबंधित तारखांना मागणी नोटीस जारी करून खालील कर्जदार/गहाणखतदारांना नोटीसमध्ये नमूद केलेल्या रकमेवर आणि आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इ. नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत पुढील व्याजासह परतफेड करण्याचे आवाहन केले आहे.

| कर्जदाराचे नाव/सह–कर्जदार/एस/पत्ता | NPA तारीख | थकबाकी रक्कम Rs.1,05,27,017/- | |
|---|---|---|---|
| (१) मे. दशमेश तेरा ट्रॅव्हल्स (कर्जदार) ७०३/७०४, त्रिवेणी सीएचएस, मिठ चौकी, मार्वेरोड., मालाड (पश्चिम), मुंबई: ४०००६४. (२) श्री. इंद्रजीत सिंग सलुजा (सह–कर्जदार) ७०३/७०४, त्रिवेणी सीएचएस, मिठ चौकी, मार्वेरोड, मालाड (पश्चिम), मुंबई: ४०००६४. (३) श्री. इंदरबीरकौर मस्मजीतसिंग सलुजा (सह–कर्जदार) ७०३/७०४, त्रिवेणी सी.एस., मिठ चौकी, मार्वेरोड., मालाड (पश्चिम), मुंबई: ४००६४. (४) श्रीमती कंवलजीत कौर (सह–कर्जदार) ७०३/७०४, त्रिवेणी सीएचएस, मिठ चौकी, मार्वेरोड., मालाड (पश्चिम), मुंबई: ४०००६४. मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्र. ७०३ आणि ७०४, सातवा मजला, त्रिवेणी सीएचएसएल, उष्मा नगर, वलनाई मेट्रो स्टेशन जवळ, मार्वेरोड जवळ, सीटीएस क्र. ३१०/ए, वलनाई गाव, मालाड (पश्चिम), मुंबई: ४०००६४, मुंबई, महाराष्ट्र, भारत | 11/05/2026 | आरओआय | 12.75% |
| | डिमांड नोटिसची तारीख | थकबाकीची मुद्दल | 9,917,626 |
| | 14/05/2026 | थकबाकीची ईएमआय रक्कम | 524,512 |
| | कर्जाची रक्कम | खंडित कालावधीवरील व्याज | 10,537 |
| | Rs. 1,05,00,000/- | थकबाकीवरील व्याज | 34,410 |
| | | कायदेशीर शुल्क | 19,832 |
| | | नोटीस शुल्क | 1,100 |
| | | ईएमआय बाऊन्स शुल्क | 19,000 |
| | APPL00010366 | एकूण थकबाकी | **1,05,27,017** |

उपरोक्त परिस्थितींमध्ये, वरील कर्जदारांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ६० दिवसांच्या आत भविष्यातील व्याज आणि लागू शुल्कासह वर नमूद केल्याप्रमाणे थकबाकी भरण्याची नोटीस देण्यात आली आहे, अन्यथा पुढील पावले उचलली जातील. या नोटिसच्या तारखेच्या ६० दिवसांची मुदत संपली आहे ज्यामध्ये कर्जदार आणि गहाण ठेवणाऱ्यांच्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे यासह आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स आणि एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्टच्या २००२ आणि त्याखालील कलम १३(४) अंतर्गत सुरक्षित मालमत्तेचा समावेश आहे. या सूचनेला उत्तर देण्यासाठी तुम्ही कोणतेही निवेदन करू इच्छित असल्यास, कृपया आमच्या अधिकृत अधिकारी श्री माहेश्वर सिंग, आनंद राठी ग्लोबल फायनान्स लि. ८व्या मजल्यावर, ए विंग, एक्सप्रेस झोन बिल्डिंग, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई: ४०००६३ ह्यांचाकडे ते चिन्हांकित करा,फक्त आम्हाला वेळेत प्रतिसाद देण्यासाठी. कृपया लक्षात घ्या की या सूचनेच्या प्रतिसादात केलेल्या तुमच्या कोणत्याही निवेदनाला प्रतिसाद न देण्यास आम्ही जबाबदार राहणार नाही, जर ही सूचना इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा ठिकाणाला उद्देशून असेल. कृपया लक्षात घ्या की उक्त कायद्याच्या कलम १३(१३) अन्वये, कोणताही कर्जदार, सुरक्षित धनकोच्या पूर्व लेखी संमतीशिवाय, नोटीसमध्ये नमूद केलेली कोणतीही सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्ट्याने किंवा अन्यथा हस्तांतरित करू शकत

तारीख: १४/०५/२०२६ ठिकाण: मुंबई — स्वा/– एसडी, आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, अधिकृत अधिकारी

ANAND RATHI — आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड: एक्सप्रेस झोन, ए विंग, १०वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, तिरपे ओबेरॉय मॉल समोर, गोरेगाव (ई), मुंबई – ४०० ०६३ भारत — **मागणी सूचना**

तर कर्जदार/सह–कर्जदारांनी आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडकडून आर्थिक सहाय्य घेतले आहे. आम्ही सांगतो की आर्थिक सहाय्याचा लाभ घेतल्यानंतरही, कर्जदार/सहकर्जदारांनी देय तारखेनुसार व्याज आणि मुद्दल रकमेची परतफेड करण्यात विविध चुका केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी केलेल्या निर्देशांनुसार/मार्गदर्शक तत्त्वांनुसार येथे नमूद केलेल्या संबंधित तारखांना खाते नॉन–परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकृत केले आहे. आनंद राठी ग्लोबल फायनान्स लि.चे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराच्या वापरात – कायदा, **SARFAESI 2002** च्या कलम १३(२) अन्वये खाली नमूद केलेल्या संबंधित तारखांना मागणी नोटीस जारी करून खालील कर्जदार/गहाणखतदारांना नोटीसमध्ये नमूद केलेल्या रकमेवर आणि आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इ. नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत पुढील व्याजासह परतफेड करण्याचे आवाहन केले आहे.

| कर्जदाराचे नाव/सह–कर्जदार/एस/पत्ता | थकबाकी रक्कम Rs. 1,38,56,311 /- | |
|---|---|---|
| (१) मच्छली एन मोरे (कर्जदार), त्याचे प्रोप्रायटर श्री योगेश यशवंत दानवे यांच्यामार्फत दुकान क्रमांक १९, गोदावरी सीएचएसएल, सहंतीवन, बोरिवली पूर्व, मुंबई– ४०००६६ येथे. (२) योगेश यशवंत दानवे (सह–कर्जदार) यांचा पत्ता ए/४०१ नारायण कुंज, राम मंदिर रोड, समोर. आनंदराव पवार शाळा, वझिरा नाका बोरिवली पश्चिम, मुंबई– ४०००९२. (३) शर्मिष्ठ यशवंत दानवे यांचा पत्ता ए/४०१ नारायण कुंज सीएचएस राम मंदिरासमोर आहे. आनंदराव पवार विद्यालय, वझिरा नाका बोरिवली (प.), मुंबई–४०० ०९२. (४) रुता योगेश दानवे यांचा पत्ता ए/४०१ नारायण कुंज, राम मंदिर, समोर. आनंदराव पवार शाळा, वजीरा नाका, बोरिवली पश्चिम, मुंबई–४०० ०९२. मालमत्तेचा तपशील: फ्लॅट क्रमांक ४०१, चौथा मजला, 'ए' विंग, क्षेत्रफळ ६१० चौ. फूट. गहाण. कार्पेट, नारायण कुंज सहकारी गृहनिर्माण लि., राम मंदिर रोड, बोरिवली पश्चिम या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमध्ये, सर्वेक्षण क्र. १३, हिस्सा क्र. १ (भाग), सीटीएस क्र. १०८ (भाग) आणि सीटीएस क्र. २७७, टीपीएस ३ मध्ये भूखंड क्र. १९२ आणि १९० वर स्थित. टीपीएस अंतिम झाल्यानंतर, योजनेअंतर्गत एफ. पी. क्र. २७८ आणि २७७, गाव एकसर, तालुका बोरिवली, एम.एस.डी., मुंबई: ४०० ०९२ यांचे वाटप करण्यात आले. | आरओआय | 12.75% |
| | मुद्दल थकबाकी | 13,007,487 |
| | ईएमआयची थकबाकी रक्कम | 680,190 |
| | खंडित कालावधीतील व्याज | 13,820 |
| | थकबाकीवरील व्याज | 131,914 |
| | ईएमआय बाऊन्स शुल्क | 8000 |
| | नोटीस शुल्क | 1,100 |
| | एकूण थकबाकी | **1,38,56,311** |
| | ARGFL/SME-LAP/JOD/1136 | |

**NPA तारीख : 11-05-2026 | डिमांड नोटिसची तारीख : 14/05/2026 | कर्जाची रक्कम : Rs. 1,37,36,000/-**

उपरोक्त परिस्थितींमध्ये, वरील कर्जदारांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ६० दिवसांच्या आत भविष्यातील व्याज आणि लागू शुल्कासह वर नमूद केल्याप्रमाणे थकबाकी भरण्याची नोटीस देण्यात आली आहे, अन्यथा पुढील पावले उचलली जातील. या नोटिसच्या तारखेच्या ६० दिवसांची मुदत संपली आहे ज्यामध्ये कर्जदार आणि गहाण ठेवणाऱ्यांच्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे यासह आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स आणि एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्टच्या २००२ आणि त्याखालील कलम १३(४) अंतर्गत सुरक्षित मालमत्तेचा समावेश आहे. या सूचनेला उत्तर देण्यासाठी तुम्ही कोणतेही निवेदन करू इच्छित असल्यास, कृपया आमच्या अधिकृत अधिकारी श्री माहेश्वर सिंग, आनंद राठी ग्लोबल फायनान्स लि. ८व्या मजल्यावर, ए विंग, एक्सप्रेस झोन बिल्डिंग, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई: ४०००६३ ह्यांचाकडे ते चिन्हांकित करा,फक्त आम्हाला वेळेत प्रतिसाद देण्यासाठी. कृपया लक्षात घ्या की या सूचनेच्या प्रतिसादात केलेल्या तुमच्या कोणत्याही निवेदनाला प्रतिसाद न देण्यास आम्ही जबाबदार राहणार नाही, जर ही सूचना इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा ठिकाणाला उद्देशून असेल. कृपया लक्षात घ्या की उक्त कायद्याच्या कलम १३(१३) अन्वये, कोणताही कर्जदार, सुरक्षित धनकोच्या पूर्व लेखी संमतीशिवाय, नोटीसमध्ये नमूद केलेली कोणतीही सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्ट्याने किंवा अन्यथा हस्तांतरित करू शकत

तारीख: १४/०५/२०२६ ठिकाण: मुंबई — स्वा/– एसडी, आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, अधिकृत अधिकारी

ANAND RATHI — आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड: एक्सप्रेस झोन, ए विंग, १०वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, तिरपे ओबेरॉय मॉल समोर, गोरेगाव (ई), मुंबई – ४०० ०६३ भारत — **मागणी सूचना**

तर कर्जदार/सह–कर्जदारांनी आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडकडून आर्थिक सहाय्य घेतले आहे. आम्ही सांगतो की आर्थिक सहाय्याचा लाभ घेतल्यानंतरही, कर्जदार/सहकर्जदारांनी देय तारखेनुसार व्याज आणि मुद्दल रकमेची परतफेड करण्यात विविध चुका केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी केलेल्या निर्देशांनुसार/मार्गदर्शक तत्त्वांनुसार येथे नमूद केलेल्या संबंधित तारखांना खाते नॉन–परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकृत केले आहे. आनंद राठी ग्लोबल फायनान्स लि.चे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराच्या वापरात कायदा, **SARFAESI 2002** च्या कलम १३(२) अन्वये खाली नमूद केलेल्या संबंधित तारखांना मागणी नोटीस जारी करून खालील कर्जदार/गहाणखतदारांना नोटीसमध्ये नमूद केलेल्या रकमेवर आणि आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इ. नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत पुढील व्याजासह परतफेड करण्याचे आवाहन केले आहे.

| कर्जदाराचे नाव/सह–कर्जदार/एस/पत्ता | NPA तारीख | थकबाकी रक्कम :Rs. 51,71,306 /- | |
|---|---|---|---|
| (१) विजय राजाराम धुमाळ (कर्जदार), ३०२, गणदीप चीएचएसएल, पवार गली, खारीगाव, कळवा, ठाणे, महाराष्ट्र ४००६०५. (२) संजीवनी राजाराम धुमाळ (सह कर्जदार), ३०२, गणदीप चीएचएसएल, पवार गल्ली, खारीगाव, कळवा, ठाणे, महाराष्ट्र – ४००६०५. (३) नॅसेंट टेक्नॉलॉजी (सह–कर्जदार), आरटीसी ७८, आर ५७० जवळ, टीटीसी इंडस्ट्रियल, एमआयडीसी राबाले, नवी मुंबई ४००७०१. मालमत्तेचा तपशील: फ्लॅट क्रमांक १९०१, १९ वा मजला, बी विंग, ग्रीन विले बिल्डिंग, युरो स्कूल सीबीएसई शाळेजवळ, अंतर्गत रस्ता, बंद. ठाणे डोंबिवली लिंक रोड, अंजूर, भिवंडी, जि: ठाणे, ठाणे: ४२१३०२. महाराष्ट्र. | 11/05/2026 | आरओआय | 13.00% |
| | डिमांड नोटिसची तारीख | थकबाकी मुद्दल | 4,894,511 |
| | 14/05/2026 | थकबाकी ईएमआय रक्कम | 252,936 |
| | कर्जाची रक्कम | खंडित कालावधीवरील व्याज | 5,302 |
| | Rs. 50,00,000/- | थकबाकीवरील व्याज | 11,457 |
| | | ईएमआय बाऊन्स शुल्क | 6000 |
| | | नोटीस शुल्क | 1100 |
| | APPL00025196 | एकूण थकबाकी | **51,71,306** |

उपरोक्त परिस्थितींमध्ये, वरील कर्जदारांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ६० दिवसांच्या आत भविष्यातील व्याज आणि लागू शुल्कासह वर नमूद केल्याप्रमाणे थकबाकी भरण्याची नोटीस देण्यात आली आहे, अन्यथा पुढील पावले उचलली जातील. या नोटिसच्या तारखेच्या ६० दिवसांची मुदत संपली आहे ज्यामध्ये कर्जदार आणि गहाण ठेवणाऱ्यांच्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे यासह आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स आणि एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्टच्या २००२ आणि त्याखालील कलम १३(४) अंतर्गत सुरक्षित मालमत्तेचा समावेश आहे. या सूचनेला उत्तर देण्यासाठी तुम्ही कोणतेही निवेदन करू इच्छित असल्यास, कृपया आमच्या अधिकृत अधिकारी श्री माहेश्वर सिंग, आनंद राठी ग्लोबल फायनान्स लि. ८व्या मजल्यावर, ए विंग, एक्सप्रेस झोन बिल्डिंग, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई: ४०००६३ ह्यांचाकडे ते चिन्हांकित करा,फक्त आम्हाला वेळेत प्रतिसाद देण्यासाठी. कृपया लक्षात घ्या की या सूचनेच्या प्रतिसादात केलेल्या तुमच्या कोणत्याही निवेदनाला प्रतिसाद न देण्यास आम्ही जबाबदार राहणार नाही, जर ही सूचना इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा ठिकाणाला उद्देशून असेल. कृपया लक्षात घ्या की उक्त कायद्याच्या कलम १३(१३) अन्वये, कोणताही कर्जदार, सुरक्षित धनकोच्या पूर्व लेखी संमतीशिवाय, नोटीसमध्ये नमूद केलेली कोणतीही सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्ट्याने किंवा अन्यथा हस्तांतरित करू शकत नाही.

तारीख: १४/०५/२०२६ ठिकाण: ठाणे — स्वा/– एसडी, आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, अधिकृत अधिकारी

ANAND RATHI — आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड: एक्सप्रेस झोन, ए विंग, १०वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, तिरपे ओबेरॉय मॉल समोर, गोरेगाव (ई), मुंबई – ४०० ०६३ भारत — **मागणी सूचना**

तर कर्जदार/सह–कर्जदारांनी आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेडकडून आर्थिक सहाय्य घेतले आहे. आम्ही सांगतो की आर्थिक सहाय्याचा लाभ घेतल्यानंतरही, कर्जदार/सहकर्जदारांनी देय तारखेनुसार व्याज आणि मुद्दल रकमेची परतफेड करण्यात विविध चुका केल्या आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी केलेल्या निर्देशांनुसार/मार्गदर्शक तत्त्वांनुसार येथे नमूद केलेल्या संबंधित तारखांना खाते नॉन–परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकृत केले आहे. आनंद राठी ग्लोबल फायनान्स लि.चे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराच्या वापरात कायदा, **SARFAESI 2002** च्या कलम १३(२) अन्वये खाली नमूद केलेल्या संबंधित तारखांना मागणी नोटीस जारी करून खालील कर्जदार/गहाणखतदारांना नोटीसमध्ये नमूद केलेल्या रकमेवर आणि आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इ. नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत पुढील व्याजासह परतफेड करण्याचे आवाहन केले आहे.

| कर्जदाराचे नाव/सह–कर्जदार/एस/पत्ता | NPA तारीख | थकबाकी रक्कम : Rs.2,22,68,086/- | |
|---|---|---|---|
| (१) महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन (कर्जदार) ओम दिव्या चेंबर्स, ए/३०३, त्रिकमदास रोड, कांदिवली पश्चिम, मुंबई:४००६७. (२) हार्दिक मनीलाल पटेल (सह–कर्जदार) गुंडेचा ट्रिलियम, फ्लॅट सी/१७०३, ठाकूर व्हिलेज रोड, सिद्धार्थ नगर, कांदिवली (पूर्व), मुंबई: ४०० १०१. (३) मणिलाल वालजी पटेल (सह–कर्जदार) गुंदेचा ट्रिलियम, फ्लॅट सी/१७०३, ठाकूर व्हिलेज रोड, सिद्धार्थ नगर, कांदिवली (पूर्व), मुंबई: ४०० १०१. मालमत्तेचा पत्ता: मॉर्टगेज ऑफ ऑफिस क्र. ३०१,३०२,३०३, ए विंग, ओएम दिव्या चेंबर्स, त्रिकमदास रोड, कांदिवली पश्चिम, मुंबई:४००६७. महाराष्ट्र | 11/05/2026 | आरओआय | 12.20% |
| | डिमांड नोटिसची तारीख | प्राचार्य थकबाकीदार | 21,072,722 |
| | 14/05/2026 | ईएमआय रक्कम प्रलंबित | 1,050,072 |
| | कर्जाची रक्कम | खंडित कालावधी व्याज | 21,424 |
| | Rs.2,20,00,000/- | थकीत व्याजापेक्षा जास्त | 101,768 |
| | | कायदेशीर शुल्क | 6,000 |
| | | नोटीस शुल्क | 1,100 |
| | | ईएमआय बाऊन्स चार्जेस | 15,000 |
| | APPL00014168 | एकूण थकबाकी | **2,22,68,086** |

उपरोक्त परिस्थितींमध्ये, वरील कर्जदारांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ६० दिवसांच्या आत भविष्यातील व्याज आणि लागू शुल्कासह वर नमूद केल्याप्रमाणे थकबाकी भरण्याची नोटीस देण्यात आली आहे, अन्यथा पुढील पावले उचलली जातील. या नोटिसच्या तारखेच्या ६० दिवसांची मुदत संपली आहे ज्यामध्ये कर्जदार आणि गहाण ठेवणाऱ्यांच्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे यासह आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स आणि एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्टच्या २००२ आणि त्याखालील कलम १३(४) अंतर्गत सुरक्षित मालमत्तेचा समावेश आहे. या सूचनेला उत्तर देण्यासाठी तुम्ही कोणतेही निवेदन करू इच्छित असल्यास, कृपया आमच्या अधिकृत अधिकारी श्री माहेश्वर सिंग, आनंद राठी ग्लोबल फायनान्स लि. ८व्या मजल्यावर, ए विंग, एक्सप्रेस झोन बिल्डिंग, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई: ४०००६३ ह्यांचाकडे ते चिन्हांकित करा,फक्त आम्हाला वेळेत प्रतिसाद देण्यासाठी. कृपया लक्षात घ्या की या सूचनेच्या प्रतिसादात केलेल्या तुमच्या कोणत्याही निवेदनाला प्रतिसाद न देण्यास आम्ही जबाबदार राहणार नाही, जर ही सूचना इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा ठिकाणाला उद्देशून असेल. कृपया लक्षात घ्या की उक्त कायद्याच्या कलम १३(१३) अन्वये, कोणताही कर्जदार, सुरक्षित धनकोच्या पूर्व लेखी संमतीशिवाय, नोटीसमध्ये नमूद केलेली कोणतीही सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्ट्याने किंवा अन्यथा हस्तांतरित करू शकत नाही.

तारीख: १४/०५/२०२६ ठिकाण: मुंबई — स्वा/– एसडी, आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, अधिकृत अधिकारी